## कविता

### धुणं

काळं कातळ बसते
जळी पाय पसरुन
काच हिंदोळ पाणी
जाते वळसा घालून

नाही थकतभागत
मागे वळून पाहते
सागराला भेटण्यास
अविरत ती वाहते

सासू,सूना,मायलेकी
येती धुवायला धुणं
चाले जोरात भांडण
गाऱ्हाणही,उणंदुणं

धुते कपडा निर्मळ
सांगे मनगटी बळ
फेसाळत्या पाण्यासंग
जाई मनचाही मळ

निळं लुगड,धोतर
वाळू घाले वाळूवर
छोटेमोठे गोटे देई
ठेवूनिया तयावर

विझे पेटलेल मन
काळ्या शेवाळ्या जळानं
चाले घेऊनिया भार
माय नदीच्या बळानं

विद्या सरपाते

# कंगनाच्या कानशिलात महिला जवानाने लावली ही बाब योग्य नाही;परंतु लोकप्रतिनिधी जेव्हा अधिकाऱ्यांच्या कानशिलात लावतात तेव्हा त्यांचे निलंबन का नाही?

कायदा हा सर्वांसाठी सारखा आहे यात दुमत नाही परंतु राजकीय पूढाऱ्यांसाठी व सर्वसामान्यांसाठी नियम वेगळे असल्याचे दिसून येते. देशात अशा हजारो घटना आपण पाहाल्या असेल किंवा ऐकल्या असेल की अनेकदा लोकप्रतिनिधी-जनप्रतिनिधी किंवा अन्य क्षेत्रातील संविधानीक पदावर असलेले राजकीय पुढारी यांनी सरकारी अधिकाऱ्यांवर किंवा कर्मचाऱ्यांसोबत भांडण किंवा वादविवाद होतं असते अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधी हात उगारल्याचे आपण सोशल मीडियावर अनेकदा पहाले. परंतु देशातील किंवा राज्यातील कोणताही आमदार-खासदार-मंत्री यांना त्यांच्या पदावरून कधीच निलंबित करण्यात आले नाही असे का? असे अनेक प्रश्न राजकीय पुढाऱ्यांच्या बाबतीत उपस्थित होतात.दिनांक ६ जून २०२४ गुरुवारला चंडीगड विमानतळावर सीआयएसएफच्या महिला कॉन्स्टेबल कुलविंदर कौर या जवानाने कंगनाच्या कानशिलात लावली.याचे कारण असे सांगितले जाते की २०२१ साली झालेल्या शेतकरी आंदोलनात सहभागी होण्यासाठी महिलांना १०० ते २०० रूपये मिळाले होते असे विधान कंगना यांनी केले होते.त्याचा बदला म्हणून संतप्त झालेल्या महिला जवानाने आंदोलनात माझी आई देखील सहभागी झाली होती.असे म्हणत कंगनाच्या कानशिलात लगावली.त्यामुळे याप्रकरणी महिला जवानावर कारवाई करत ताबडतोब निलंबित करण्यात आले. कंगनाच्या कानशिलात लगावली हा महिला जवानाचा गुन्हा आहे यात दुमत नाही. परंतु शेतकऱ्यांबद्दल घृणास्पद किंवा विद्वेषक वक्तव्य करने कंगनाला खरोखरच शोभते का याचा विचार सुध्दा कंगनाने करायला पाहिजे.कंगनाने अनेकदा विद्वेषक वक्तव्ये केली आहेत त्यामुळे ती अनेकदा वादाच्या भोवऱ्यात सुध्दा अडकली होती.त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांनी किंवा हायप्रोफाइल व्यक्तींनी आपल्या जीभेवर ताबा ठेवायला हवा.कारण तोंडातून शब्द हा निघून जातो आणि तो जर सर्वसामान्यांच्या किंवा शेतकऱ्यांच्या जिव्हारी लागला तर त्यांच्या तळपायाची आग मस्तकात जाते तोच प्रकार चंडीगड विमानतळावर घडल्याचे दिसून येते.प्रत्येकांनी जीभेवर जर ताबा ठेवला तर चंडीगड विमानतळावर घडलेल्या घटना कदापि घडणार नाही किंवा टाळता येईल. भारत हा कृषिप्रधान देश आहे त्यामुळे शेतकऱ्यांना कायकाय यातना भोगाव्या लागतात हे फक्त शेतकऱ्यांना व त्यांच्या कुटुंबीयांनाच माहीत असते. याची जान कंगनाने ठेवायला पाहिजे.प्रत्येक राजकीय पुढारी म्हणतो की मी शेतकरी आहे, मी शेतकऱ्यांचा मुलगा आहे हे वक्तव्य फक्त राजकारणापुरते सिमित असते आणि असली चेहरा पडद्याच्या आड असतो. परंतु जो शेतकरी व त्यांचे कुटुंब राबराब राबतो व घाम गाळतो त्यांच्या वेदना त्यांनाच ठाऊक असते.त्यांच्या वेदना बद्दल कदाचित कंगनाला ठाऊक नसावे.त्यामुळेच कदाचित २०२१ च्या शेतकरी आंदोलन दरम्यानचे कंगनाचे विद्वेषक विधान महिला जवानांच्या डोक्यात भेडसावत असावेत त्यामुळेच वेळेची संधी पाहून कंगनाच्या कानशिलात लावली असावी. परंतू शेवटी हा गुन्हाच आहे.कारण महीला जवानाने कायदा हातात घेतला. त्यामुळे सजा व्हायलाच हवी.परंतु हाच नियम आमदार,खासदार,मंत्री किंवा अन्य संविधानिक पदावरील राजकीय पदाधिकारी यांनाही लागू व्हायला पाहिजे. तसे पहाले तर अशा घटना व्हायलाच नको.आश्चर्याची गोष्ट म्हणजे चंडीगड विमानतळावर झालेल्या मारहाण प्रकरणी कंगना रनौट्या प्रती सिनेइंडस्ट्रीतील कोणीही प्रतिक्रिया दिलेली नाही.यावरून स्पष्ट होते की कंगना रनौटची सर्वसामान्यांच्या प्रती असलेली वागणूक ठीक नसावी.त्यामुळेच चंडीगड विमानतळावरील घटनेला बॉलिवूडने कंगनाच्या प्रती पाठिंबा दिलेला नाही.यावर मी हेच सांगेल की राजकीय पुढाऱ्यांनी मग ती महिला असो अथवा पुरुष कोणतेही वक्तव्य करतांना सावधगिरी बाळगुन वक्तव्य करावे जेणेकरून सर्वसामान्यांच्या, शेतकऱ्यांच्या किंवा गरीबांच्या भावना पुन्हा-पुन्हा दु:खावनार नाही याची दक्षता सर्वच राजकीय पक्षांनी व पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे.

ले ख क
रमेश कृष्णराव लांजेवार (माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.




साने गुरुजी निवासी विद्यालय केज येथे अनुकंप तत्वावर मुलाला घ्या या मागणीसाठी सामाजिक न्याय भवन बीड समोर तिसऱ्या दिवशीही आमरण उपोषण सुरू उपोषणकर्त्या सुनीता गीत्ते यांची प्रकृती खालावली प्रशासनाची दुर्लक्ष

# स्वारातीच्या समस्या मंत्र्यांच्या दारी : कार्यवाही करण्याचे दिले आदेश

## मंत्री हसन मुश्रीफ यांची माजी आमदार संजय दौंड यांनी घेतली भेट

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

अंबाजोगाई येथिल 'स्वाराती' रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय सध्या विविध समस्यांनी ग्रासले आहे. सोनोग्राफी, सिटीस्कॅन, डायलिसिस वारंवार बंद पडत आहेत. अपुरे तंत्रज्ञ, रिक्त कर्मचाऱ्यांची पदे यामुळे 'स्वाराती' च्या आरोग्य सेवेवर परिणाम होताना दिसून येत आहे. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी माजी आ. संजय दौंड यांनी पुढाकार घेतला असून त्यांनी दि.११ जून मंगळवार रोजी मंत्रालयात वैद्यकीय शिक्षण व संशोधन मंत्री हसन मुश्रीफ यांची भेट घेत रुग्णालयाच्या समस्यांचा पाडाच वाचला. या समस्यांबाबत माजी आ. संजय दौंड यांनी मंत्री महोदयांना रितसर निवेदनही दिले. या निवेदनाला सकारात्मक प्रतिसाद देत मंत्री हसन मुश्रीफ यांनी 'स्वाराती' च्या समस्या जाणून घेत तात्काळ प्रलंबित प्रस्तावांवर कार्यवाही करण्याचे आदेश वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाच्या सचिवांना, आयुक्तांना दिले आहेत. या बाबत प्राप्त माहिती अशी की, गोरगरीब रुग्णांसाठी आशेचे किरण असलेल्या अंबाजोगाई येथिल 'स्वाराती' रुग्णालयाला गेल्या काही महिन्यांपासून घरघर लागली आहे. रुग्णालयातील सोनोग्राफी, सिटीस्कॅन, डायलिसिस वारंवार बंद असल्याने याचा त्रास सर्वसामान्य रुग्णांना होत आहे. त्यासोबतच रुग्णालयात असणारी यंत्रसामग्री सुव्यवस्थित चालवण्यासाठी अपुरे तंत्रज्ञ आणि रिक्त कर्मचाऱ्यांची पदे यामुळे 'स्वाराती' च्या रुग्णसेवेवर परिणाम होत आहे. या समस्या घेऊन माजी आ.संजय दौंड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, गोविंद देशमुख, शिवाजी सिरसाट यांच्यासह 'स्वाराती' चे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांची मंत्रालयाच्या दालनात रितसर भेट घेतली. यावेळी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे सचिव, आयुक्त आणि अधिकारी उपस्थित होते.



**मंत्री मुश्रीफ यांनी तात्काळ कार्यवाही करण्याचे दिले आदेश**

मंत्री हसन मुश्रीफ यांनी 'स्वाराती' च्या समस्या जाणून घेत त्यावर सविस्तर अशी चर्चा केली. रुग्णालयात अन्य नवीन विभाग सुरू करण्यासाठी तसेच सिटीस्कॅन, डायलिसिस, सोनोग्राफी यासह अन्य सेवा पूर्वपदावर आणण्यासाठी आणि अपुरे तंत्रज्ञ, रिक्त कर्मचाऱ्यांची पदे तात्काळ भरण्यासाठी कार्यवाही करण्याचे आदेश वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाच्या सचिव, आयुक्तांना दिले आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात 'स्वाराती' रुग्णालय व वैद्यकीय महाविद्याःलयाच्या समस्या कमी होतील आणि गोरगरीब रुग्णांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

